सकाळ

# ‘वयोमर्यादेत बदलाचा विचार नाही’

**सकाळ न्यूज नेटवर्क**

## यूपीएससी परीक्षा

नवी दिल्ली, ता. २५ : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा अधिकारीपदांच्या परीक्षेसाठी उमेदवारांची कमाल वयोमर्यादा घटविण्याचा प्रस्ताव वादात सापडताच केंद्र सरकारने ‘असा कोणताही विचार नाही,’ असे स्पष्टीकरण आज दिले. नीती आयोगाच्या शिफारसीच्या माध्यमातून वयोमर्यादा घटविण्याचे हे पिलू सोडण्यात आल्यावर त्यावर चौफेर टीका झाली होती. यूपीएससीसाठी सर्वसाधारण वर्गातील परीक्षार्थींना ३२ ही कमाल वयोमर्यादा असते. ती घटवून २७ वर आणण्याचा सरकारचा विचार होता. पान ७ वर »

Pune, Main
26/12/2018 Page No. 1

# ‘वयोमर्यादेत बदलाचा विचार नाही’

» पान १ वरून

यूपीएससीच्या परीक्षांसाठी उमेदवारांची वयोमर्यादा घटविण्याची चर्चा गेली काही दिवस सुरू होती. मात्र, पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री जितेंद्रसिंह यांनी असा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले. केवळ एखाद्या अहवालावरून तसाच निर्णय होणार, अशी कोणतीही कल्पना करू नये, असेही जितेंद्रसिंह यांनी सांगितले.

या प्रस्तावित निर्णयाच्या विरोधात देशभरात विद्यार्थ्यांनी निषेध निदर्शने सुरू केली होती. लोकसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असताना हा वाद महागात जाऊ शकतो, अशी स्पष्ट चिन्हे दिसल्यानंतर मोदी सरकारने हा निर्णय जाहीर केला. नीती आयोगाने ‘स्ट्रॅटेजी फॉर न्यू इंडिया ॲट ७५’ नामक अहवालात वरील शिफारस केली होती. यात न्यू इंडिया शब्द असल्याने मूळ कथाकल्पना कोणाची असणार, याबद्दल वेगवेगळे तर्क लढविले जातात.

आयोगाच्या प्रस्तावात यूपीएससी परीक्षार्थींची कमाल वयोमर्यादा ३२ वर्षांवरून घटवून २७ वर्षांवर आणावी, अशी शिफारस केली होती. मागासवर्गीयांसाठीच्या ३७ वर्षांच्या वयोमर्यादेवर मात्र आयोगाचा अहवाल मौन होता. हा नवा प्रस्तावित बदल २०२२-२३ पासून लागू करण्यात यावा, असेही नीती आयोगाने म्हटले होते.

त्याचप्रमाणे नागरी सेवांसाठी केंद्र व राज्यांच्या पातळीवर सध्या वेगवेगळ्या ६० परीक्षा घेतल्या जातात. उदा. महाराष्ट्रात एमपीएससी ही परीक्षा घेतली जाते. इतक्या परीक्षांऐवजी यूपीएससीची एकच परीक्षा घेतली जावी, अशीही सूचना आयोगाने केली होती.

### ‘लॅटरल एन्ट्री’चे समर्थन

**निती आयोगाच्या अहवालात नागरी सेवांतील सर्व प्रवर्गांची भरती व निवड ही केंद्रीय स्तरावर गुणवत्तेचे काटेकोर निकष लावून करावी, असे नमूद केले होते. नोकरशाहीच्या वरिष्ठ वर्तुळातील नाराजीला कारणीभूत ठरलेला ‘लॅटरल एन्ट्री’चा जो प्रयोग मोदी सरकारने केला, त्याची जोरदार भलामण आयोगाने केली. तसेच प्रत्येक क्षेत्रात विशेषज्ज्ञांची पुरेशी संख्या असण्यासाठी लॅटरल एन्ट्रीचा प्रयोग आणखी मोठ्या प्रमाणावर राबविण्यातचीही गरज प्रतिपादन केली होती.**

Pune, Main
26/12/2018 Page No. 7